# नवोपक्रम

## समग्र शिक्षा जिल्हा परिषद परभणी

केंद्र - मानवत ता. मानवत जि. परभणी

## माझा नवोपक्रम 2020-21

कोव्हीड -19 काळात ऑनलाईन क्लास दिव्यांग विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

नवोपक्रम राबविणाऱ्याचे नाव :- जलशिंगे ज्ञानेश्वर लक्ष्मणराव, विशेष शिक्षक (MR)

कें प्रा शा मानवत ता. मानवत जिल्हा परभणी

## नवोपक्रम राबविण्याऱ्याची माहिती

1. स्पर्धकाचे पूर्ण नाव - श्री जलशिंगे ज्ञानेश्वर लक्ष्मणराव
2. संपर्क क्रमांक - 8329857424
3. ईमेल आईडी - djalshinge1979@gmail.com
4. कायमचा पत्ता - मु पो कोळणूर ता. जळकोट जि. लातूर
5. जन्मतारीख - 19/07/1979
6. शैक्षणिक अर्हता - HSC DSE (MR)
7. एकूण सेवा - 15 वर्ष 6 दिवस
8. नवोपक्रमाचे विषय- कोव्हीड -19 काळात ऑनलाईन क्लास दिव्यांग विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास



# अनुक्रमणिका


| अ.क्र. | नवोपक्रमाच्या पायऱ्या | पान क्रमांक |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावना | |
| 2 | नवोपक्रमांची उद्दिष्टे | |
| 3 | नवोपक्रमांची नियोजन व कार्यवाही | |
| 4 | नवोपक्रमांची यशस्विता व फलनिष्पत्ती | |
| 5 | समारोप | |
| 6 | परीशिष्टे | |
| 7 | केलेल्या कामाचे फोटो | |

# प्रस्तावना

**कोव्हीड -19 काळात ऑनलाईन क्लास; दिव्यांग विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास**

शैक्षणिक वर्ष 2019 - 20 च्या शेवटी शेवटी म्हणजेच माहे मार्च 2020 मध्ये कोरोना या महामारीचा फैलाव सर्व जगात पसरल्याच्या बातम्या वाऱ्यासारख्या पसरू लागल्या त्याच माहामारीचा शिरकाव आपल्या भारत देशात देखील झाला होताच, यातून शहरी व ग्रामीण भागांचा देखील समावेश होता. अशा परिस्थितीत दि. 21 मार्च 2020 रोजी पासून संपूर्ण देशात लॉकडाऊन लागु करण्याची घोषणा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने शाळांचा देखील समावेश करण्यात आला असल्याने शाळा बंद झाल्या व त्यामूळे शिक्षण थांबले. सर्वसामान्य विद्यार्थ्यांबरोबर दिव्यांग विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षण कसे होईल, त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात कसे टिकवून ठेवावे याचा प्रश्न सतत मला भेडसावत होता.

सर्वसामान्य विद्यार्थी कोणत्या न कोणत्या मार्गाने शिक्षणाच्या प्रवाहात होते परंतू खरा प्रश्न होता तो दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बाबतीत साधारण परिस्थितीत अनेक आव्हाने असतांना या माहामारीच्या काळात त्यांचे शिक्षण कसे होईल, ते शिक्षणापासून वंचित तर राहणार नाहीत नां? असे विविध प्रश्न मनात गोंधळ करीत होते. अशा बिकट परस्थितीत सदर दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांना मुख्य प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखणे आवश्यक होते. त्यासाठी कोविड – 19 च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करून संबधित विद्यार्थ्यांपर्यंत पोहचणे त्यांच्याशी संपर्क करणे हे सर्वात मोठे आव्हान होतेच.

अशा परिस्थितीत सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करून कुठल्याही प्रकारे संसर्ग होणार नाही अशा विविध बाबींची खबरदारी घेऊन संबधित दिव्यांग विद्यार्थ्यांची व त्यांच्या पालकांची भेट घेणे, त्यांच्या मनातून या महामारीची भिती कमी करून प्रतिबंधात्मक उपाय करून शालेय अध्ययन कसे सुरू ठेवता येईल याबाबत चर्चा केली, त्यांचे समूपदेशन केले याप्रमाणे पालकांची भिती दूर करून विद्यार्थ्यांसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन करून दिव्यांग विद्यार्थ्यांना गृहमार्गदर्शन, थेरेपी सुविधा देण्यात आली. संबधित दिव्यांग विद्यार्थ्यांना दैनंदिन शालेय शिक्षणाबरोबरच त्यांचा सर्वांगीण विकास देखील महत्वाचा असल्याने त्यासाठी विविध उपक्रम राबविले व त्यांचे शालेय शिक्षण व सर्वांगीण विकास हे दोन्ही बाबी समांतर सुरू ठेवण्याचा एक प्रमाणिक प्रयत्न केला, तो म्हणजे **कोव्हीड -19 काळात ऑनलाईन क्लास; दिव्यांग विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास !**

## नवोपक्रमाची उद्दिष्टये

21 शतकातील आवश्यक असलेले कौशल्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना गरजेनुसार शिक्षण देवून उद्दिष्टये साध्य करण्यासाठी खालील बाबी उपयुक्त ठरतील.

1. स्कुल रेडीनेस प्रोग्राम राबविणे.
2. शाळेच्या मुख्य् प्रवाहात आणणे.
3. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार कौशल्ये विकसित करणे.
4. दिव्यांग विद्यार्थ्यांना अभ्यासगटांमध्ये बसण्याची सवय (अंगणवाडी ते इ.12 वी)
5. तंत्रज्ञानाचा उपयोग करुन शिकणे.
6. वैयक्तिक व सामाजिक बांधिलकी जोपसणे.
7. कोरोना कालावधीत आवश्य्क ती घ्यावयाची काळजी बाबत माहिती.
8. घरगूती साहित्याचा शिक्षणासाठी वापर

## नवोपक्रमाची नियोजन व कार्यवाही

कोरोना -19 चा फैलाव संपूर्ण जगभर पसरला होता, त्यात आपल्या भारत देशाचा देखील त्यात समावेश होताच, 21 मार्च 2020 रोजी संपूर्ण देशात लॉकडाऊन जाहीर झाल्यानंतर सर्व व्यवस्थापनांसोबत शाळा देखील बंद करण्याची घोषणा करण्यात आली व मुलांचे शिक्षण थांबले. अशा बिकट परिस्थितीत सर्वसामान्य असलेले विद्यार्थी हे कोणत्या न कोणत्या मार्गाने शिक्षणाच्या प्रवाहात होते परंतू खरे आव्हान होते ते म्हणजे दिव्यांग विद्यार्थ्यांचे शिक्षण कसे होईल? ते देखील विविध प्रवर्गातील व विविध इयत्तांमध्ये शिक्षण घेत असलेले दिव्यांग विद्यार्थी, विविध ठिकाणी वास्तव्यास असलेले, तसेच अशा भितीच्या वातावरणात पालकांचे अपेक्षित सहकार्य मिळेल की, नाही असे विविध आव्हानांमध्ये मन गुंतलेले असतांना एक उपाय सुचला तो म्हणजे **'ऑनलाईन शिक्षण'.**

या ऑनलाईन शिक्षणासाठी पुढील प्रमाणे नियोजन केले, सर्वप्रथम इयत्ता निहाय व प्रवर्गनिहाय दिव्यांग विद्यार्थ्यांचे वास्तव्य सद्य:स्थितीत कोठे कोठे आहे याची माहिती गोळा केली, त्यानंतर सदर विद्यार्थ्यांचे त्यांच्या क्षमतांनुसार अभ्यासक्रम ठरविले, त्यांना त्यांच्या इयत्तानुसार कसे शिक्षण देता येईल याचे पालकांच्या समंती व सोयीनुसार वेळापत्रक तयार केले.

**कार्यवाही :-** ऑनलाईन शिक्षण देण्यासाठी केलेल्या नियोजनानूसार प्रत्यक्ष कार्यवाही पुढील प्रमाणे करण्यात आली.

1. सुरूवातीस प्रत्येक दिव्यांग विद्यार्थ्यांना गरजेनूसार त्यांच्या पालकांशी फोनवर संपर्क करून अभ्यासक्रम व छोट्या छोट्या कृतीयुक्त उपक्रम देण्यात आले. सदर उपक्रम संबधित दिव्यांग विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालक व भावंडासोबत सहभागी होऊन राबविण्यात आले.
2. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांशी संपर्क करून त्यांचा तालुकास्तरीय सर्व प्रवर्ग व सर्व इयत्तांचा एकत्रित एकच तालुकास्तरीय WhatsApp ग्रुप तयार केला व त्याव्दारे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या इयत्ता, क्षमतांनूसार व गरजेनूसार शालेय अभ्यासक्रम व कृती देण्यात येऊन विद्यार्थ्यांनी सोडविलेला स्वाध्याय त्याच ग्रुपवर पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या, विद्यार्थ्यांनी पाठविलेल्या व सोडविलेल्या स्वाध्यायाचे नियमित अवलोकन करून गरजेनूसार वैयक्तिक विद्यार्थ्यांना फोनव्दारे मार्गदर्शन केले.
3. कोरोना -19 काळात लॉकडाऊन संदर्भात शासनाचे सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करून माझ्या मानवत शहर केंद्रातील 60 विद्यार्थ्यांना गृहभेटी देवून त्या विद्यार्थ्यांना या काळात कोण कोणती आव्हाने आहेत याची माहिती घेतली असता, त्यात प्रकर्षाने संबधित विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या विविध कृती, उपक्रम, मोबाईल हाताळणे, अभ्यासक्रम सादर करतांना येणाऱ्या अडचणी तसेच सामन्य विद्यार्थ्यांना सूचना देणे सोपे असते परंतू दिव्यांग विद्यार्थ्यांना मात्र त्यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधणे आवश्यक असते. त्यामूळे प्रत्यक्ष गृहभेटी देऊन त्यांची आव्हाने व अडचणी लक्षात घेऊन त्यांना मार्गदर्शन व ऑनलाईन क्लास मध्ये कसे सहभागी व्हावे याबाबत सर्व मार्गदर्शन केले.
4. सदर ऑनलाईन क्लास संदर्भात सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांचे ऑनलाईन पालक प्रशिक्षण घेतले व त्यातून संबधितांच्या वेळेनूसार म्हणजेच बरेचशे पालक हे कामानिमित्ता दिवसभर घराबाहेर राहत असल्यामूळे त्यांना त्यांच्या पाल्यासाठी मोबाईल उपलब्ध होईल अशी सोयीची वेळ ही सायंकाळचीच असल्याचे निदर्शनास आल्यामूळे सर्वांसाठी ऑनलाईन क्लासची वेळ सायंकी 7.30 ते 8.30 ही सर्वानुमते ठरविण्यात आली व संबधितांना ऑनलाईन क्लासमध्ये उत्स्फुर्त सहभागी कसे व्हावे याबाबत सुचना देऊन प्रत्यक्षात कृती करून दाखविले.
5. यानूसार मी दि.01 जून 2020 रोजी पहिल्या ऑनलाईन क्लासचे आयोजन केले, ज्यात सुमारे 60 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. ज्यात एकाच मोबाईलवर दोन किंवा तीन किंवा चार असे त्यांच्या सोयीनूसार विद्यार्थी सहभागी झाले होते, तसेच आजपर्यंत शासनाच्या निर्देशानूसार

जेव्हा ऑनलाईन / ऑफलाईन क्लासला सुट्टी जाहीर करण्यात येते ते दिवस वगळता व साप्ताहिक सुट्टी रविवार वगळता दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीचा ऑनलाईन क्लास नियमितपणे व उत्स्फुर्तपणे सुरू आहे.

6. या ऑनलाईन क्लासमध्ये नियमित वेळापत्रकानूसार इयत्ता निहाय शालेय अभ्यासक्रम व गरजेनूसार क्षमताधिष्ठीत कृती इ. ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना गरजेनूसार त्यांना आवश्यक असलेली OT,PT,ST थेरेपी या ऑनलाईन क्लासमध्ये तज्ज्ञ मार्गदर्शकांमार्फत व Video Content व्दारे प्रात्याक्षिक दाखवून पालकांकडून विद्यार्थ्यांना देण्यात आली.

7. यानुसार शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले विविध उपक्रम उदा. (चला शिकुया प्रयोगातून विज्ञान , We Learn English, WhatsApp स्वाध्याय, दिक्षा ॲप, टिली-मीली, कोरोना योद्धा स्पर्धा, Astronomy Club , Wild life Club, आरोग्याची काळजी इ.) उपक्रम हे तर राबविलेले आहेतच परंतू दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवणे व त्यांचा सर्वांगीण विकास होणे हे खरे आव्हान या कोरोना -19 काळात असल्यामूळे त्यांचेसाठी ऑनलाईन क्लासच्या माध्यमातून शालेय अभ्यासक्रम व क्षमताधिष्ठीत व गरजेनूसार आवश्यक असे विविध कृतीयुक्त उपक्रम राबवून त्यांच्यात असणाऱ्या विविध कलागुणांना सादर करण्यासाठी एक ऑनलाईन व्यासपीठ उपलब्ध करून दिले जेणेकरून त्यांचा सर्वांगीण विकासास चालना मिळाली.

   1. आर्ट थेरेपी :- मातीकाम, रंगकाम, चित्र रंगविणे, ठसे मारणे इ.
   2. मंडाला आर्ट :-
   3. हस्तकला :- आकाश कंदील, केक बनविणे
   4. आनंददायी शिक्षण :-
   5. विविध कला गुण सादर करणे :-
   6. सामाजिक व घरातील सदस्यांशी बांधिलकी :-
   7. व्यवसायपूर्व कौशल्यांना वाव :-
   8. सुविधा :- फिजीओथेरेपी, ऑक्यूपेशनल थेरेपी व स्पीच थेरेपी एकूण 12 दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गरजेनूसार तज्ञ व्यक्तीचे मार्गदर्शन घेवून संबंधित दिव्यांग विद्यार्थ्यांना ऑफलाईन पालक व शिक्षकांच्या मदतीने थेरेपी देण्यात आली.

## नवोपक्रमांची यशस्विता / फलनिष्पत्ती

कोव्हिड – 19 या काळामध्ये ऑनलाईन गुगल मीट क्लास हा नवोपक्रम सुरु झाल्यापासून यशस्विता लक्षात येवू लागली.

1. एप्रिल - 2020 महिन्यामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना मोबाईल व्दारे पालकांना संपर्क करुन गरजेनूरुप पालक भावंड विषयमित्र यांचा आधार घेवून दररोज दिव्यांग विद्यार्थी 100% प्रतिसाद दिला.
2. एप्रिल - 2020 महिन्यामध्ये शेवटच्या आठवडयात त्यांना गुगलमीट घेण्यासंदर्भात 100% प्रतिसाद.
3. 25 एप्रिल 2020 रोजी पालक प्रशिक्षण गुगलमीट वर पालकांचा 100 % प्रतिसाद.
4. Whats app group वर दिव्यांग विद्यार्थ्यांकडून विज्ञान प्रयोग करणे दर शनिवार व रविवार 28 विद्यार्थी प्रतिसाद.
5. टिव्ही वर टिली – मिली कार्यक्रम पाहून अभ्यास करणे बाबत प्रतिसाद.
6. रेडीओ वर we learn english हा प्रोग्राम ऐकूण कृती करण्यास प्रतिसाद
7. 28 दिव्यांग विद्यार्थ्यांचा Whats app वरील स्वाध्याय सोडविण्यास प्रतिसाद.
8. अभ्यासगटांमध्ये 28 दिव्यांग विद्यार्थी नियमित बसू लागले.
9. पालक व भावंडाच्या मदतीने स्वंयअध्ययन दिव्यांग विद्यार्थी करु लागले.
10. दि.01/06/2021 रोजी पासून आनंददायी शिक्षण ऑनलाईन क्लास घेण्यात येत आले. यामध्ये 1. चेक इन क्रिया 2. सजगता 3.कथा 4. कृती 5. अभिव्यक्ती आतापर्यंत वर्ग 1 ली व 2 रीच्या सजगता / कथा – 60, कृती -40 व अभिव्यक्ती -30 विद्यार्थ्यांचा 100 % प्रतिसाद मिळाले.
11. अध्ययन निष्पत्ती दिव्यांग विद्यार्थ्यांचे विचार करुन आकार पुस्कातील गरजेनूरुप 78 अध्ययन निष्पत्ती 100 % विद्यार्थ्यांकडून करुन घेण्यात आले.
12. विद्यार्थी हळूहळू गरजेनुसार आपापल्या शाळेच्या क्लासला जॉईन होवून अभ्यासक्रम पूर्ण करत आहेत.
13. 3 दिव्यांग विद्यार्थी नवोदय परीक्षा दिले व 2 विद्यार्थी 2021-22 या वर्षासाठी सराव चालू आहे.
14. एन एम एम एस परीक्षेसाठी 2 दिव्यांग विद्यार्थ्यांचा सराव सुरू आहे.
15. एम टी एस परीक्षेसाठी 2 दिव्यांग विद्यार्थ्यांचा सराव सुरू आहे.
16. स्पोकन इंग्लीश क्लास मध्ये 15 दिव्यांग विद्यार्थ्यांचा समावेश असून दररोज सादरीकरण करतात.
17. कोरोना योध्दा स्पर्धेमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पालकांचा तालुक्यातून पहिला क्रमांक

# नवोपक्रमांची गरज व महत्व

कोरोनाचे सावट पूर्ण देशभर चालू होते कोरोणामूळे  शाळा बंद झाल्या होत्या परभणी जिल्हयातील मानवत तालुक्यातील मानवत केंद्रातील विखुरलेले दिव्यांग विद्यार्थी गुणवत्ता व गरजेनुसार शिक्षण प्रवाहापासून दुर जात होते त्यामुळे विचार करुन 60 दिव्यांग विद्यार्थ्यांचे वर्ष जावू नये व दिव्यांग विद्यार्थ्यांचे कौशल्ये विकसित करणे हे कर्तव्ये समजून आपल्या जवळ असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करुन मोबाईल वरुन **दिव्यांग विद्यार्थी पालक समुह मानवत** हा Whats app group तयार करण्यात आला.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार Whats app group वर सुरुवातीस माहिती नसलेल्या गरजेनुसार गोष्टी माहिती करुन देवून ऑनलाईन  गरजेनुसार शिक्षण देणे सुरु झाले. ऑनलाईन शिक्षणाबरोबर ऑफलाईन शिक्षण होणे पालक समुपदेशन करण्यात आले दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार साहित्याचा वापर करुन होणे गरजेचे होते विद्यार्थ्यांसाठी पालकांनी वेळ देणे या सर्व गोष्टी गरजेच्या होत्या

1. ऑनलाईन पालक प्रशिक्षण
2. ऑन कॉल अध्यापन
3. विषयमित्र / शिक्षणप्रेमी अभ्यासगटांमध्ये सहभाग
4. ऑनलाईन क्लास साठी शाळेचे नियोजन
5. आनंददायी शिक्षण
6. Whats app group दिलेला अभ्यास पूर्ण करणे
7. तज्ञ मार्गदर्शनाच्या व्हिडीओ मार्फत फिजीओथेरेपी घेणे.
8. गरजेनुरुप  MAIEP या युटयूब चॅनलला दिव्यांग विद्यार्थी जॉईन होणे.
9. We learn english मंदिर,शाळा, समाजमंदिर, मस्जिद व इत्र सार्वजनिक ठिकाणी हा कार्यक्रम ऐकविण्यात येत होता.

सद्यस्थितीत कोरोणा महामारीत विद्यार्थी घरीच सुरक्षित ठिकाणी शिक्षण घेणे गरजेचे आहे. याचाच विचार करुन ऑनलाईन गुगल मीट व Whats app च्या सहाय्याने नवोपक्रमास सुरुवात करण्यात आली.

# Online Class Participation













## फिजिओथेरेपी



## चला शिकूया प्रयोगातून विज्ञान या उपक्रमामध्ये दिव्यांग विद्यार्थी सहभाग



❖ व्यवसायपूर्व कौशल्य अंतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांनी तयार केलेली कलाकृती

व्यवसाय पूर्व कौशल्ये




बैलपोळा सजावट



रांगोळी स्पर्धा

दिवाळी निमित्त् 60 दिव्यांग विद्यार्थ्यांनी आकाश कंदिल बनवून आपल्या घरी लावले.



हिबारे सिध्दी प्रवर्ग- HI या विद्यार्थीनींने विशेष शिक्षक यांच्या वाढदिवसानिमीत्त् केक बनवला.



जयदिप राऊत प्रवर्ग – TB

## ❖ Leap Painting Art Therapy :-










**अभ्यासगटामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांचा समावेश**

**मानवत केंद्रातील सर्व पालकांचा सहभाग**



दिनांक :- 05/09/2020

प्रमाणपत्र क्रमांक :- 44

जिल्हा परिषद शिक्षण विभाग परभणी

जिंतुर रोड परभणी - 431 401 Web - http://zpeduparbhani.in/

✲ प्रशस्तीपत्र ✲

श्री / श्रीमती श्री धानोरकर निवास अशोकराव

शाळा प्रा.शा.शाखा क्र. 2 मानवत तालुका मानवत

यांनी कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या परिस्थितीत केलेल्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल सदर प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात येत आहे.

डॉ. सुचिता पाटेकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद परभणी.


सौ.अंजलीताई गंगाप्रसाद आनेराव, शिक्षण, क्रीडा व आरोग्य सभापती, जिल्हा परिषद परभणी.

पृथ्वीराज बी.पी. (भाप्रसे), मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद परभणी.

श्रीमती निर्मलाताई उत्तमराव गवळी(विटेकर), जिल्हा परिषद अध्यक्षा, जिल्हा परिषद परभणी.



**स्वाध्याय उपक्रम**



ConveGenius

सोडविले. Closing the gap in educational achievem

4 मी कोणतीही मदत न घेता स्वत:हून क्विझ पूर्ण केले.

सायंकाळ ७:४५

4 सायंकाळ ७:४५

आपण 20 पैकी 10 प्रश्नांची उत्तरे अचूक दिली आहे. 👏

सायंकाळ ७:४५

चला **Marathi - आठवडा 3** स्वाध्याय सुरु करूयात! आपल्याला, एक एक करून **20 प्रश्न** विचारले जातील. फक्त आपले उत्तर म्हणून पर्याय क्रमांक पाठवा. पूर्ण उत्तर टाइप करू नका. शुभेच्छा 👍

**आपण सराव सुरू करू इच्छिता?**

1 होय

2 नाही

सायंकाळ ७:४५

मेसेज लिहा

**समारोप**